# बोर्ड कृतिपत्रिका: फेब्रुवारी 2023

**Time : 3 Hours** **Max. Marks: 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना:**

(१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने व्यवस्थित काढाव्यात.

(२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग १ – गद्य [२०]

**कृती १. (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (८)**

(१) लेखकाने सांगितलेल्या आनंदाच्या गंमती –

(य) ...................

(र) ................... (२)

(२) (य) आनंदाविषयी उताऱ्यात आलेली काव्यपंक्ती –

(र) प्रस्तुत काव्यपंक्तीविषयी लेखकाने व्यक्त केलेले मत – (२)

आनंद सगळ्यानांच हवा असतो... पण आपला आनंद नेमका कशात आहे, हे अनेकांना कळत नसतं. आनंद म्हणजे नेमकं काय हेही उलगडलेलं नसतं. कुठे असतो हा आनंद? कुठे नसतो हा आनंद? आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे! ही फक्त कविकल्पनाच नव्हे, तेच सत्य आहे, किंबहुना शाश्वत सत्य आहे!

आनंदाची गंमत कशी आहे, की तुम्ही शोधू लागलात, की तो दडून बसतो, पकडू गेलात, की हातातून निसटतो. आनंदासाठी जितका आटापिटा कराल, तितका तो हुलकावण्या देतो. जितका सहजपणे घ्याल, तितका आनंद सहज प्राप्त होतो. आनंद असतोच. तो अनुभवता मात्र यावा लागतो.

आनंदाच्या बाबतीत कळसा काखेत असूनही आपण गावाला वळसा घालीत असतो. आनंद आपण बाहेर शोधत असतो आणि तो मात्र आत असतो. आनंद आपल्या मनातच असतो. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो.

हे खरं आहे, की आनंद सर्वत्र असतो; पण अंतरंगात आनंद असेल, तरच तो अनुभवता येतो. आनंदाचं नातं जुळतं, ते फक्त आनंदाशी. आनंदाला आकर्षित करतो, तो फक्त आनंदच.

(३) स्वमत अभिव्यक्ती – (४)

'आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतरंगातच असतो', या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.

**किंवा**

'आनंदाची तुमची संकल्पना' तुमच्या शब्दांत लिहा.

**(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (८)**

(१) लेखकाने शक्तिप्रदर्शन करताना दिलेल्या धमक्या – (२)

(य) ...................

(र) ...................

(२) दंतवैद्याने केलेल्या दोन क्रिया – (२)

(य) ...................

(र) ...................

Target Publications

दंतवैद्य अलीकडे फारच माणसाळलेले आहेत असे माझे प्रामाणिक मत झाले. त्याने माझ्या हिरड्यांत इंजेक्शन देऊन इतका लीलया दात उपटला, की मी आश्चर्यचकित होऊन पाहतच राहिलो! दात उपटण्याची क्रिया इतकी सोपी असेल असे वाटले नव्हते. मी आजवर शत्रूंना आणि शेजाऱ्यांना भांडणाच्या वेळी 'दात उपटून हातात ठेवीन', 'दात घशात घालीन' अशा माझ्या शक्तीचे प्रदर्शन करणाऱ्या धमक्या दिल्या होत्या. त्यांना काहीच अर्थ नव्हता, याची हळहळ दंतवैद्याच्या खुर्चीत असतानाच वाटली.

दंतवैद्याने दात दाखवला. हाच तो खलदंत! ज्याने माझे बायकोपुढे हसे केले तोच हा नीच दात. नतद्रष्ट! 'तुला हेच शासन योग्य आहे' असे मी उरलेले दातओठ खाऊन मनाशी म्हणालो. आता पुन्हा तो ठणका लागणार नाही, पुन्हा ते बोळे धरावे लागणार नाहीत. पुन्हा बायकोचा उपदेश ऐकावा लागणार नाही. ह्या विचारांनी मी आनंदाने बेहोश झालो. उरलेल्या दातांना धाक बसावा म्हणून तो काढलेला दात घरी नेण्याचा विचार मनात येऊन गेला; पण त्या दाताची संगतसुद्धा नको असे वाटून मी तो दंतवैद्यालाच अर्पण केला. आनंदाने घरी आलो. दारातूनच ओरडून चार-पाच शेजाऱ्यांना सांगितले, की "तो तुम्हांला जागवणारा दात गेला. यापुढे दंतसप्ताह नाही."

(३) स्वमत अभिव्यक्ती – (४)

'यापुढे दंतसप्ताह नाही,' लेखकाच्या या विधानाची कारणमीमांसा तुमच्या शब्दांत करा.

**किंवा**

दातदुखीच्या कथा-व्यथा सोदाहरण लिहा.

**(इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(४)**

(१) लेखिकेच्या मते पुढे पुढे येणाऱ्या लाटा म्हणजे – (२)

(य) ...................

(र) ...................

मी वेड्यासारखी समुद्र पाहत राहायची. कधी सकाळी तर कधी चांदण्यारात्री, पाण्यावर सांडलेलं चांदणं पाहिलं की वाटायचं सगळा समुद्र ओंजळीत पकडावा. कसं थंड, शांत वाटायचं. मनातले सगळे विकल्प लयाला गेले असायचे. अवघं अस्तित्व निरामय होऊन जायचं. आपण आणि हा अथांग पसरलेला समुद्र! बाकीची जाग-जाण मिटलेली असायची. अशी अभूतपूर्व शांतता मी पूर्वी कधी अनुभवलेली नव्हती. मुरुडच्या समुद्रानं मला बांधून ठेवलं. मी लिहायला लागले त्यामागे या मुरुडच्या समुद्राची फार मोठी प्रेरणा आहे. पुढे पुढे येणाऱ्या लाटा म्हणजे महत्त्वाकांक्षा, यश आणि आत्मविश्वासाचं प्रतीक वाटायच्या, तर मागे मागे सरकणाऱ्या लाटा म्हणजे पराभव, अपयश, मानहानी पचवणारी शक्ती. समुद्राच्या पोटात किती काय काय दडलं असेल! त्यानं किती पचवलं असेल, किती सहन केलं असेल. माणसाच्या मनाचं मला ते दुसरं रूप वाटायचं. समुद्राशी माझा संवाद चालायचा.

– गिरिजा किर

(२) 'पाण्यावर सांडलेलं चांदण पाहिलं' की लेखिकेची होणारी भावावस्था – (२)

(य) ................... .

(र) ................... .

## विभाग २ – पद्य **[१६]**

**कृती २. (अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **(८)**

(१) कवितेतील स्त्री करत असलेली विविध कामे – (२)

(य) .........................

(र) .........................



Target Publications

(२) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा – (२)

(य) गोंदणाच्या हिरव्या नक्षीप्रमाणे शेत पिकाने सजवते. (१)

(र) स्वत:चा जीवच जणू कांद्याच्या रोपाच्या रूपात लावते. (१)

सरी वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग, जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

फुलं सोन्याची, झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग, देह तोडते
बाई तोडते
घरादाराला, तोरण बांधते
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

ऊस लावते, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग, मन दाबते
बाई दाबते
कांड्या-कांड्यांनी, संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन, मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं, पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

(३) अभिव्यक्ती

कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता कष्टकरी शेतकरी स्त्रीचे योगदान स्पष्ट करा. (४)

Target Publications

**(आ) खालील ओळींचा अर्थ लिहा.** (४)

ह्या विंचवाला उतारा।
तमोगुण मागें सारा।
सत्त्वगुण लावा अंगारा।
विंचू इंगळी उतरे झरझरां।।
सत्त्व उतारा देऊन।
अवघा सारिला तमोगुण।
किंचित् राहिली फुणफुण।
शांत केली जनार्दनें।।

**(इ) खालीलपैकी कोणतीही <u>एक</u> कृती सोडवा.** (४)

**काव्यसौंदर्य :**

कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा !
सांगती 'तात्पर्य' माझें सारख्या खोट्या दिशा :
"चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा !"
माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा !

वरील ओळींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

**किंवा**

**रसग्रहण:**

समुद्र अस्वस्थ होऊन जातो
शहराच्या आयुष्याच्या विचाराने.
तेव्हा तो मनांतल्या मनांतच मुक्त होऊन फिरूं लागतो
शहरांतल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून.
उशिरापर्यंत रात्रीं तो बसलेला असतो
स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या रुळांवरील रहदारी पाहत.

वरील काव्यपंक्तींचे रसग्रहण करा.

## विभाग ३ – साहित्यप्रकार : कथा

[१०]

**कृती ३. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** (४)

**(अ)** (१) एका वाक्यात उत्तरे लिहा.

(य) कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचण्यामागील कारण लिहा. (१)

(र) कथेतील भाषायोजनेचे घटक लिहा. (१)

कथेत चांगल्या-वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते. कथेत प्रत्येक वेळी संघर्ष किंवा नाट्य हे वाईट घटनांचेच असते असे नाही, तर आनंद आणि सुखात्मिक घटनांतूनही नाट्यमयता निर्माण होते. कथेच्या शेवटी कथेतील अनुभवांचा, घटनांचा उत्कर्षबिंदू नाट्यपूर्णरीतीने साधता येतो; पण तरीही कथानकाच्या ओघात स्वाभाविकपणे झालेला शेवट वाचकाला आकर्षित करतो.

कथेतील संवाद हे चटपटीत, आकर्षक, वाचकांच्या भावविश्वाला स्पर्श करणारे आणि कथानकाला प्रवाही ठेवणारे असतात. पात्रांच्या स्वभावधर्मानुसार व परिस्थितीजन्य घटकांनुसार संवाद लिहिले जातात. या संवादात लय व आंतरिक संगती महत्त्वाची असते. संवादातून रसनिर्मिती आणि रसपरिपोष होत असतो. अर्थपूर्ण संवाद कथेला वेगळी उंची प्राप्त करून देतात.

Target Publications

कथानक भाषेच्या मदतीने साकार होत असते. कथेतील पात्रांच्या स्वभाव वैशिष्ट्यांनुसार व कथेतील वातावरणानुसार भाषेची योजना केली जाते. कथाकार, त्याचा दृष्टिकोन, त्याची अनुभव घेण्याची पद्धत यांनुसार कथेचे भाषारूप आणि शैलीविशेष निश्चित होत जातात. कथा लिहिताना साधारणत: प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांची सरमिसळ केली जाते. तसेच कथा पूर्णपणे बोलीभाषेतही लिहिली जाते.

(२) कथेतील संवादाची वैशिष्ट्ये लिहा. (२)

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(६)**

(य) अनु व सुनीता यांच्यात निर्माण झालेला भावनिक बंध लिहा.

(र) बापू गुरुजींनी गावातील शाळेसाठी केलेले प्रयत्न तुमच्या शब्दांत लिहा.

(ल) अनुच्या स्वभाव वैशिष्ट्यांचे वर्णन करा.

(व) बोर्डिंगमधील मुलांचे बापू गुरुजींबद्दलचे प्रेम तुमच्या शब्दांत व्यक्त करा.

## विभाग ४ – उपयोजित मराठी [१४]

**कृती ४.(अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(४)**

(१) मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी लिहा.

(२) माहितीपत्रकाचे महत्त्व स्पष्ट करा.

(३) अहवाल लेखनाची उपयुक्तता लिहा.

(४) वृत्तलेखाच्या भाषेची वैशिष्ट्ये लिहा.

**(आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **(१०)**

(१) खालील मुद्द्यांच्या आधारे 'मुलाखतीचा समारोप' स्पष्ट करा:
भाषिक कौशल्ये ....... परिणामकारक निवेदन ....... अनपेक्षित समारोप ........ श्रोत्यांचा प्रतिसाद ........ मुलाखतीची यशस्विता.

(२) खालील मुद्द्यांच्या आधारे माहितीपत्रकाची रचना वैशिष्ट्ये स्पष्ट करा:
माहितीला प्राधान्य .......... उपयुक्तता ......... वेगळेपण ........... आकर्षक मांडणी ........... भाषाशैली.

(३) खालील मुद्द्यांच्या आधारे अहवालाची प्रमुख अंगे स्पष्ट करा:
प्रास्ताविक ........... अहवालाचा मध्य .......... अहवालाचा शेवट ........... अहवालाची भाषा .......... अहवालाची आवश्यकता.

(४) खालील मुद्द्यांच्या आधारे वृत्तलेख लिहितांना विचारात घ्यावयाच्या बाबी स्पष्ट करा:
वाचकाची अभिरूची ......... तात्कालिक महत्त्व ....... वेगळेपणा वाचकांचे लक्ष वेधणे .......... वृत्तलेखाची शैली.

## विभाग ५ – व्याकरण व लेखन [२०]

**व्याकरण घटक व वाक्प्रचार.**

**कृती ५. (अ) सूचनेनुसार कृती करा.** **(१०)**

(१) (य) किती आतून हसतात ती ! (१)

वरील विधानाचे विधानार्थी वाक्य ओळखून लिहा:

(१) ती आतून हसतात.

(२) ती फार हसतात आतून.

(३) ती आतून हसत राहतात.

(४) ती खूप आतून हसतात.

(र) सूचनेप्रमाणे सोडवा. (१)
अशी माणसं क्वचितच सापडतात.
(नकारार्थी वाक्य करा.)

(२) (य) योग्य पर्याय निवडा. (१)
'पतिपत्नी' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.
(१) कर्मधारय समास
(२) विभक्ती तत्पुरूष समास
(३) इतरेतर द्वंद्व समास
(४) द्विगू समास

(र) 'निलकंठ' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा. (१)

(३) (य) योग्य पर्याय निवडा. (१)
कमलने बक्षीस मिळवले.
या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.
(१) कर्तरी प्रयोग
(२) कर्मणी प्रयोग
(३) भावे प्रयोग
(४) यांपैकी नाही.

(र) योग्य पर्याय निवडा. (१)
' भावे प्रयोग' असलेले वाक्य शोधून लिहा.
(१) आज लवकर सांजावले.
(२) त्याने कपाटात पुस्तक ठेवले.
(३) युवादिनी वक्त्याने प्रेरणादायी भाषण दिले.
(४) त्याने माझ्या हिरड्यांत इंजेक्शन दिले.

(४) (य) योग्य पर्याय निवडा: (१)
जो अंबरी उफाळता खुर लागलाहे।
तो चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे।।
वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.
(१) अर्थान्तरन्यास
(२) अतिशयोक्ती
(३) अनन्वय
(४) अपन्हुती

(र) न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजांतील
या वाक्यातील उपमेय ओळखा (१)

(५) (य) 'मुखवटा चढवणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा. (१)
(१) मुळात नसलेले रूप धारण करणे.
(२) मुखावर पांघरूण घालणे.
(३) मुखावर लेप लावणे.
(४) खूप मोठा पराक्रम करणे.

(र) 'मुखवटा चढवणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा. (१)

Target Publications

**(आ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे २०० ते २५० शब्दांत निबंध लिहा.** **(१०)**

(१) मी अनुभवलेला पाऊस

(२) माझा आवडता खेळाडू

(३) मी फळा बोलतोय

(४) पेट्रोल संपले तर .....

(५) वाचते होऊया

Target Publications